# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# महानगरपालिका निवडणुकांचा मार्ग मोकळा

## येत्या काही दिवसांत राज्यात पुन्हा आचारसंहिता लागू शकते : कारणांचं वर्गीकरण करण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले



**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ज्या कारणांमुळे निवडणुका रखडल्या आहेत, त्या कारणांचं वर्गीकरण करण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यात पुन्हा आचारसंहिता लागू शकते.

राज्यातील महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत आणि जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. त्यामुळे त्यामुळे 'ईशाद' या संस्थेकडून सुप्रीम कोर्टात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. या याचिकेवरील सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने महत्वाची टिपण्णी केली.

राज्यनिहाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित असणाऱ्या कारणांचे वर्गीकरण करण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. प्रत्येक राज्यातील कारणमीमांसा व परिस्थिती वेगळी आहे, जर समाधानकारक कारण नसेल तर निवडणूक घेण्याचे आदेश देता येतील, असंही कोर्टाने म्हटलय.

केवळ महाराष्ट्र नाही तर देशातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित असल्याने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आलेली होती. त्यावर कोर्टाने निर्देश देत एक प्रकारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचं संकेत दिले आहेत.

राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीच्या निकालात २३० जागांवर महायुतीने यश मिळवलेलं आहे. एवढं मोठ यश मिळाल्यांनतर आता तर महापालिकेच्या निवडणुका लागतील, असा सूर विरोधकांनी आळवला होता. त्यामुळे खरंच निवडणुका होतात की नाही, हे पाहाणं महत्त्वाचं आहे.

## तब्बल 5059 मालमत्तांचे जप्ती अधिपत्र तयार; आता कोणत्याही वेळी होणार मालमत्ता जप्तीची कारवाई..!

### जप्ती अधिपत्र सादर केलेल्या मालमत्ता तात्काळ जप्त करण्याचे करसंकलन विभागाकडून आदेश




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये ६ लाख ३३ हजार २९४ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यामध्ये सर्वाधिक ५ लाख ४१ हजार १६८ निवासी मालमत्ता, ५७ हजार ७३३ बिगरनिवासी, ४ हजार ५६३ औद्योगिक, ११ हजार ३२३ मोकळ्या जमिनी, १६ हजार १ मिश्र आणि २ हजार ५०६ इतर इतक्या मालमत्ता आहेत. चालू आर्थिक वर्षामध्ये आत्तापर्यंत एकूण ४ लाख ०२ हजार मालमत्ताधारकांकडून ५६५ कोटी रुपयांचा मालमत्ताकर महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये जमा करण्यात आला आहे. एकूण मालमत्ताधारकांपैकी अद्याप २ लाख २२ हजार ६५६ इतक्या मालमत्तांची थकबाकी आहे. थकीत कराची वसुली करण्यासाठी कर आकारणी व कर संकलन विभागाने सर्व विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांची थकबाकी वसुली कार्यवाहीसाठी आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये प्रत्येक प्रकरणांचा आढावा घेण्यात आला व थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचअनुषंगाने, सर्व विभागातील थकबाकी असलेल्या ५०५९ मालमत्तांचे जप्ती अधिपत्र काढण्यात आले आहे. अशा अटकावणी व जप्ती अधिपत्राद्वारे थकबाकीदारांची मालमत्ता जप्त करण्यासाठी करसंकलन विभागाच्या विभागीय कार्यालयाचे प्रशासन अधिकारी यांना नेमण्यात आले आहे. सदर जप्ती अधिपत्राच्या आधारे कर संकलन विभागाच्या विभागीय कार्यालयाचे प्रशासन अधिकारी यांना 'नमुना ह' च्या जप्ती अधिपत्राद्वारे मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे आता ज्या मालमत्ता संदर्भात जप्ती अधिपत्र काढणेत आले आहे अशा मालमत्तांची आता कोणत्याही वेळी मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार कर संकलन विभागाच्या विभागीय कार्यालयाच्या प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

ज्या मालमत्तांचे नमुना 'ह' प्रमाणे अटकावणी किंवा जप्ती अधिपत्र काढण्यात आले आहेत अशा मालमत्तांना मालमत्ताकराच्या बिलासोबतच जप्ती पूर्व नोटीस बजाविण्यात आली होती. परंतू तरी सुध्दा सदर मालमत्तांनी विहित कालावधीमध्ये थकीत कराचा भरणा न केल्याने अशा थकीत मालमत्तेच्या थकीत रकमेच्या किमतीची जंगम मालमत्ता अटकावून ठेवावी किंवा थकीत मालमत्तेच्या जागेवरील कोणतीही स्थावर मालमत्ता जप्त करण्याचे आदेश व अधिकार कर संकलन विभागाच्या विभागीय कार्यालयाच्या प्रशासन अधिकाऱ्यांना करसंकलन विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडून देण्यात आले आहेत.

करसंकलन विभागाकडून १५ विभागीय कार्यालयामधील ५०५९ मालमत्तांचे जप्ती अधिपत्र काढण्यात आलेल्या मालमत्तांकडे २३४.३१ कोटींची थकबाकी असून २८.१९ कोटींची चालू मागणी अशी २६२.५० कोटींची एकूण मागणी आहे. याच अनुषंगाने मोशी विभागीय कर संकलन कार्यालयाकडून तात्काळ कार्यवाही सुरु करण्यात आली असून स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आल्या असून शहरातील इतर विभागीय कर संकलन कार्यालयाकडूनसुध्दा थकबाकीदारांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

त्याचबरोबर, मालमत्ता जप्ती सोबतच आता थकबाकीदारांच्या मालमत्तांचे नळ कनेक्शन खंडीत करण्याची कारवाई करण्यात यावी, असेसुध्दा आदेश कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत प्रत्येक विभागीय कार्यालयास देण्यात आले आहेत. थकीत मालमत्ताकरावर प्रतिमहिना

> "ज्या मालमत्ता जप्तीस पात्र आहेत अशा ५०५९ मालमत्ता जप्ती अधिपत्राद्वारे तात्काळ जप्त करण्याचे आदेश संबधित विभागीय कार्यालयांना देण्यात आलेले असून उपरोक्त आदेशाच्या आधारे विभागीय कर संकलन कार्यालयाने जप्तीची कारवाई सुरु केलेली आहे. विशेषत: ज्या मालकांनी आपली निवासी मालमत्ता आर्थिक उत्पन्न मिळण्याच्या अनुषंगाने भाडे तत्वावर दिलेल्या आहेत, तसेच मिश्र व व्यावसायिक कारणांसाठी वापरात असलेल्या मालमत्ता संदर्भात प्राधान्याने जप्ती करण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सबब, ज्या मालकांना त्यांच्या मालमत्तेच्या अनुषंगाने आर्थिक उत्पन्न प्राप्त होत असतानाही मालमत्ता कर थकविणाऱ्या थकबाकीदारांनी लवकरात लवकर आपल्या थकीत कराचा भरणा करुन महानगरपालिकेकडून करण्यात येणारी जप्तीची कारवाई टाळावी."
>
> - अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी - चिंचवड महानगरपालिका

## पिंपळे सौदागर येथील योगा पार्कचे काम अंतिम टप्प्यात

### माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी केली कामाची पाहणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

रहाटणी-पिंपळे सौदागर येथील योगा पार्कचे काम अंतिम टप्प्यात आहे असून लवकरच या गार्डनचे लोकार्पण होणार असल्याची माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी दिली. पिंपळे सौदागर येथे बनविण्यात येणाऱ्या योगा पार्कच्या विकास कामाची पाहणी माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील व अधिकारी यांच्या समवेत केली.

नागरिकांसाठी विविध सोयीसुविधायुक्त असे योगा पार्क पिंपळे सौदागर येथे साकारण्यात येत आहे. यामध्ये १८ मीटर उंचीची बोल्डरिगं वॉल, २१ मीटर स्पीड वॉल, २१ मीटर लीड वॉल, लहान मुलासाठी विविध खेळणी प्रकार, जेष्ठासाठी बैठक व्यवस्था, स्वतंत्र योगा व्यायामासाठी व्यवस्था, वॉकीग ट्रॅक, प्रशस्त गार्डन व्यवस्था बनविण्यात आली आहे. या योगा पार्क मधे बनविण्यात आलेली क्लायबिंग वॉल ही अशिया मधील सर्वात मोठी वॉल आहे. या वॉल मध्ये सराव करणारे मुले ही नॅशनल लेवल स्तरावर खेळतील अशी अपेक्षा नाना काटे यांनी यावेळी व्यक्त केली.

या पाहणीवेळी शहर अभियंता मकरंद निकम, स्मार्ट सिटीचे सहशहर अभियंता मनोज सेठीया, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता माणिक चव्हाण, उद्यान विभागाचे उपअभियंता गोसावी, शिर्के कंपनीचे लावंड, स्वामी, जाधव, शिखर संघटनेचे पश्चिम महाराष्ट्राचे सरचिटणीस श्रीकृष्ण कडुसकर, व इतर सहकारी उपस्थित होते.

# इंम्पोर्टेड वाहनांची वाढती ‘क्रेझ’

## शहरातील नागरिकांच्या जीवनमानात देखील कमालीचा बदल झाल्याची स्तिथी आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मोठे उद्योग व्यवसाय, लाखो रुपयांचे नोकरीचे पॅकेज यामुळे शहरातील नागरिकांच्या जीवनमानात देखील कमालीचा बदल झाल्याची सृथिती आहे. बदलत्या जीवनशैलीबरोबरच इंम्पोर्टेड महागडी वाहने वापरण्याची ‘क्रेझ’ देखील शहरवासियांमध्ये दिसत आहे. गेल्या वर्षभरात पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाकडे तब्बल ३०३ इंम्पोर्टेड वाहनांची नोंद झाली आहे. त्यामध्ये दुचाकीपेक्षा चारचाकींचा अधिक समावेश आहे.

विदेशात तयार होणाऱ्या दुचाकी अथवा चारचाकी वाहनांना देशात आयात केले जाते, अशा वाहनांना इंम्पोर्टेड वाहने म्हणतात. दसरा, दिवाळीसारख्या शुभमुहूर्तावर घरोघरी नवनव्या वस्तुंची खरेदी करण्याची परंपरा आहे. त्यामुळे अनेकांच्या घरी नवीन वाहने दिसून येतात. दिवाळीच्या सुरूवातीपासून वसुबारस ते भाऊबीजेपर्यंत शहरात सात हजार ३४० वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. त्यामध्ये दुचाकी ते विविध अवजड प्रवासी व व्यावसायिक वाहनांची नोंद झाली आहे. याद्वारे ४२ कोटींपेक्षा अधिक महसुल आरटीओ विभागाच्या खात्यात जमा झाला आहे. पिंपरी-चिंचवड औद्योगिक शहर असल्याने अनेकांचे मोठमोठे व्यवसाय, उद्योगधंदे, तसेच मोठमोठ्या पगारांच्या नोकऱ्यांचे पॅकेज असल्याने शहरात करोडपतींची संख्या देखील मोठी आहे. त्यामुळे, आवडी आणि ऐपतीनुसार अनेकजण वेगवेगळ्या प्रकारच्या महागड्या वाहनांची खरेदी करून आपली हौस पूर्ण करतात.



### मालकाकडे इंम्पोर्टेड वाहनांचा करभरणा

» या वाहनांची खरेदी करताना मालकाला आयात कर भरावा लागतो. यासह सीमा कराची रक्कम भरावी लागत असल्याने इंम्पोर्टेड वाहनांच्या किंमती अधिक वाढतात. हलक्या मोटर वाहनाला एकूण किंमतीच्या २० टक्के कर भरावा लागतो. तर दुचाकीला एकूण किंमतीच्या २० टक्के कर भरावा लागतो.

### कोणत्या वाहनांना पसंती

» यावर्षी दिवाळीत शहरातील करोडपतींनी रोल्स रॉयस, बेंटले, फरारी, लेम्बोर्गिनी, एमवी अगस्ता, डुकाटी आदी प्रकारच्या करोडो रूपये किंमत असलेल्या इंम्पोर्टेड वाहनांची खरेदी केली आहे. आरटीओकडे या वर्षी ३०३ वाहनांची नोंद झाली आहे. यामध्ये ३९ दुचाकींचा समावेश आहे. तर २३३ चारचाकी वाहनांची नोंद झाली आहे. याबरोबरच इतर वाहनांमध्ये ट्रॅक्टर, क्रेन, फोर्कलिफ्ट आदी ३१ वाहनांची नोंद झाली आहे.

### खरेदी केलेल्या वाहनांची संख्या

» दुचाकी - ३९
» चारचाकी - २३३
» इतर (ट्रॅक्टर, क्रेन, फोर्कलिफ्ट) - ३१

“इंम्पोर्टेड वाहन वापरणाऱ्यांची संख्या वाढली आहे. यावर्षी ३०३ वाहनांची नोंद झालेली आहे. त्यामध्ये दुचाकी व चारचाकीसह इतर वाहनांचा समावेश आहे. या वाहनांना कर देखील वाहनांच्या किंमतीनुसार आणि शासनाच्या नियमानुसार आकारला जातो.”
- राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड

---

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत : योगेश बहल

## राष्ट्रवादीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन..

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पिंपरी तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी मध्यवर्ती कार्यालय, खराळवाडी येथे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी बहल म्हणाले की, डॉ. आंबेडकरांचे जीवन हे केवळ एक व्यक्ती नसून संपूर्ण भारतीय समाजासाठी प्रेरणास्त्रोत आहे. बाबासाहेबांनी आपले बहुतांश आयुष्य सामाजिक विषमता, जातीय भेदभाव आणि वंचित वर्गाच्या हक्कांसाठी लढण्यात घालवले, बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन आणि त्यांची विचारधारा तसेच आजही त्यांनी समाजासाठी दिलेला बंधुता, समानता, एकात्मतेचा संदेश चिरंतनकाळ प्रेरणास्त्रोत म्हणून राहील, अशा महामानवाला आपण सर्वजण महापरिनिर्वाण दिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस आदरांजली वाहतो.

यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल, भोसरी विधानसभा संघटक प्रकाश सोमवंशी, मा.नगरसेवक राजू बनसोडे, बन्सी पारडे, ओबीसी अध्यक्ष विजय लोखंडे, ओबीसी प्रदेश कार्याध्यक्ष ॲड सचिन औटे, महिला कार्याध्यक्षा कविताताई खराडे, असंघटीत कामगार अध्यक्ष रविंद्र ओव्हाळ, व्यवस्थापन सेल अध्यक्ष अकबर मुल्ला, झोपडपट्टी विभाग अध्यक्ष संतोष निसर्गंध, वाहतूक सेल अध्यक्ष विनोद वरखडे, उद्योग व व्यापार अध्यक्ष श्रीकांत कदम, युवक कार्याध्यक्ष तुषार ताम्हाने, प्रसन्ना डांगे, उपाध्यक्ष गोरोबा गुजर, संदिपान झोंबाडे, ख्रिश्चन सेल अध्यक्ष डॅनियल दळवी, उपाध्यक्ष बापू कातळे, प्रदीप गायकवाड, सामाजिक न्याय विभाग कार्याध्यक्ष यश बोथ, सामाजिक न्याय उपाध्यक्ष कुमार कांबळे, सरचिटणीस अभिजीत आल्हाट, विनय शिंदे, रवींद्र सोनवणे, निखिल सिंह, राजू चांदणे, झहीर (छोटू) खान, जावेदभाई जकाते, सचिन वाल्हेकर, नीलम कदम, श्रीनिवास बिराजदार, सतीश सूर्यवंशी, विराज बनसोडे, कार्यालयीन संपर्क प्रमुख धनाजी तांबे, सुनिल अडागळे इत्यादी पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# पुणे स्मार्ट सिटीला पिंपरी-चिंचवडची भुरड

## नागरिकांच्या सोयीसाठी दिव्यांग भवन, वेस्ट टू एनर्जी यांसारखे उपक्रम सुरू केले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने दूरदृष्टिकोनातून शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी दिव्यांग भवन, वेस्ट टू एनर्जी यांसारखे उपक्रम सुरू केले आहेत. हे स्तुत्य उपक्रम आणि प्रकल्प अनुकरणीय आहेत, असे मत पुणे स्मार्ट सिटी विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी व्यक्त केले.



पिंपरी-चिंचवड महापालिकेचे विविध प्रकल्प, उपक्रम आदी ठिकाणी पुणे स्मार्ट सिटी विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांनी भेट दिली. त्यानंतर त्या महापालिका अधिकारी व प्रकल्प समन्वयकांशी बोलत होत्या. महापालिकेतर्फे सुरू असलेल्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामकाजाचा आढावा घेताना त्यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडून माहिती घेतली. नवीन इमारतीची रचना जाणून घेतली. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उपआयुक्त विठ्ठल जोशी, अविनाश शिंदे, मनोज लोणकर, संदीप खोत, मुख्य आपती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

### महापालिकेचे असेही प्रकल्प

» मोशी येथील वेस्ट टू एनर्जी, हॉटेल वेस्ट टू बायोगॅस प्रकल्प, बांधकाम राडारोडा प्रक्रिया केंद्र, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांना भेट देऊन पुणे स्मार्ट सिटी विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी माहिती घेतली. महापालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी व कार्यकारी अभियंता हरविंदरसिंह बन्सल यांनी त्यांना माहिती दिली.

» मोरवाडी येथे महापालिकेने उभारलेल्या दिव्यांग भवनालाही मनीषा आव्हाळे यांनी भेट दिली. यावेळी समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त श्रीनिवास दांगट, दिव्यांग भवन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी यांनी दिव्यांग भवनाची व तेथील उपक्रमांची माहिती दिली.

» निगडी येथील आयसीसीसी या महापालिकेच्या प्रकल्पासही त्यांनी भेट दिली. स्मार्ट सिटीचे किरणराज यादव, लेखाधिकारी सुनील भोसले, माहिती तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, कॉंप्युटर प्रोग्रामर संजय जाधव यांनी प्रणालीची माहिती दिली.

# अनधिकृत होर्डिंगधारकांवर गुन्हे दाखल

## गल्लीबोळात फ्लेक्सने गर्दी : चारजणांकडून 46 हजार 500 रुपयांचा दंड वसूल

**पिंपरी | प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर, पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृत होर्डिंग्ज, फ्लेक्स आणि किऑस्कचा सुळसुळाट वाढला. गल्लीबोळात फ्लेक्सने गर्दी केली. या विद्रुपीकरणाची दखल घेत महापालिकेने गेल्या सात दिवसांत विशेष कारवाई मोहीम राबवत दोन अनधिकृत होर्डिंगधारकांवर गुन्हे दाखल केले आहेत. चारजणांकडून 46 हजार 500 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. कारवाईदरम्यान, तब्बल 8 हजार 335 फ्लेक्स, किऑस्क जप्त केले आहेत.



पिंपरी-चिंचवड हद्दीतील किवळेत 17 एप्रिल 2023 मध्ये अनधिकृत होर्डिंग कोसळून 5 मजुरांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर जागे झालेल्या महापालिकेने शहरातील 174 अनधिकृत होर्डिंग जमीनदोस्त केले. त्यामुळे शहरात सद्य:स्थितीत 1 हजार 300 होर्डिंग अधिकृत असल्याचा दावा महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचा आहे. महापालिकेच्या विरोधात उच्च न्यायालयात पिंपरी-चिंचवड आउटडोअर असोसिएशनने दावा दाखल केला होता. न्यायालयाने नियमानुसार असलेल्या होर्डिंगधारकांना परवानगी देण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार त्या होर्डिंग व्यावसायिकांकडून आवश्यक कागदपत्रांसह परवाना शुल्क भरून घेण्यात येत आहे. तरीही शहरात अनधिकृत होर्डिंग लावले जात असल्याचे चित्र आहे. त्यात विधानसभा निवडणुकीनंतर गल्लीबोळात, चौकात, मोकळ्या जागेत बेकायदा फ्लेक्स व किऑस्क लावण्यात आले. नवनिर्वाचित आमदारांचे अभिनंदन करणारे हे फ्लेक्स व किऑस्क होते. या फ्लेक्स व किऑस्कच्या गर्दीमुळे शहर विद्रुप झाले होते.

### कारवाई यापुढेही सुरू राहणार

» पिंपरी-चिंचवड शहरात बेकायदा होर्डिंग, फ्लेक्स व किऑस्क लावणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यासाठी सात दिवस विशेष कारवाई मोहीम हाती घेण्यात आली. त्यात चार जणांवर दंड करण्यात आला आहे. तर, दोन जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ही कारवाई या पुढेही सुरू राहणार आहे, असे आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

त्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आकाशचिन्ह व परवाना विभागाने शहरभर विशेष कारवाई मोहिम राबविली. त्यात बेकायदा होर्डिंग्ज, फ्लेक्स आणि किऑस्कवर कारवाई केली. परवाना निरीक्षकांसह क्षेत्रीय कार्यालयाच्या पथकाने क्षेत्रीय कार्यालयनिहाय ही कारवाई केली. कारवाईत 8 हजार 335 फ्लेक्स, किऑस्क काढून जप्त केले.

प्रशांत तलवारे, मुकेशकुमार सहा, सुखवानी बिल्डर्स, राहुल गुट्टे, श्रीहरी शिंपी या चार जणांकडून 46 हजार 500 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. रवींद्र रामदास काळोखे यांच्यावर चिखली पोलिस ठाण्यात आणि श्रीनिवास मडगुंजी यांच्यावर भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**कारवाई मोहीम**

अनधिकृत होर्डिंग, बॅनर, फ्लेक्सची संख्या : 1 हजार 573

अनधिकृत किऑस्कची संख्या : 6 हजार 762

एकूण दंड वसूल : 46 हजार 500

गुन्हे दाखल : 2

# कागदपत्रांची पूर्तता नसल्यास सहा वर्षांचा कर

## कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी अंतिम नोटीस : कागदपत्रे जमा न केल्यास सहा वर्षांपूर्वीपासूनचा कर लावण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या करसंकलन विभागाने केलेल्या मालमत्ता सर्वेक्षणात, शहरातील 2 लाख 51 हजार 165 नवीन मालमत्ता आढळून आल्या आहेत. त्यापैकी 2 लाख 3 हजार 894 मालमत्तांची मोजणी पूर्ण झाली आहे. त्यापैकी एक लाख 13 हजार 831 जणांना मालमत्ताकर आकारणीसाठी कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी अंतिम नोटीसाही बजावण्यात आल्या आहेत. कागदपत्रे जमा न केल्यास सहा वर्षांपूर्वीपासूनचा कर लावण्यात येणार आहे.




कागदपत्रे मालमत्तेस अद्यावत व बिनचूक नाव लावण्यासाठी तसेच, विशेष दिनांकापासून आकारणी करण्यासाठी आवश्यक आहेत. ज्या मालमत्ताधारकांनी कागदपत्रे सादर केलेली नाहीत अशा मालमत्ताधारकांना पुन्हा कागदपत्रांसाठी अंतिम नोटीस बजाविण्यात आली आहे.

इमारत किंवा जमीन किंवा फ्लॅटची मालकी हक्काची कागदपत्रे, खरेदीखत किंवा इंडेक्स टू, सातबारा उतारा, मिळकतपत्रिका, मालमत्ता एमआयडीसी किंवा पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण किंवा पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांच्याकडील असल्यास रजिस्टर अग्रीमेंट, दस्त व संबंधित संस्थेने निर्गमित केलेले ताबा पत्राची सत्य प्रत. मिळकतीबाबत नोंदणीकृत बक्षीसपत्र किंवा वाटणीपत्र झाले असल्यास त्याची सत्य प्रत. इमारत बांधकाम परवानगी प्राप्त असल्यास मंजूर बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व मंजूर नकाशाची प्रत या कागदपत्रे

### सात दिवसांत कागदपत्रे जमा न केल्यास महापालिका कर ठरविणार

» शहरातील नागरिकांनी मालमत्ताकर आकारणीसाठी आवश्यक कागदपत्रे सात दिवसांमध्ये विभागीय करसंकलन कार्यालयामध्ये जमा करावीत. नोटीसवर देण्यात आलेल्या पत्त्यावर पोस्टाद्वारे किंवा नमूद केलेल्या ई-मेलद्वारेही कागदपत्रांची पूर्तता करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. नोटीस बजावूनही कागदपत्रे सादर न केल्यास आणि अयोग्य आकारणी झाल्यास त्याची जबाबदारी महापालिकेची राहणार नाही, असे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

संबंधित मालमत्ताधारकांनी सादर करावीत.

नोटीस बजावूनही कागदपत्रे सादर न केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 150 (अ) मधील तरतुदीनुसार सहा वर्षे मागे जाऊन मालमत्ताकराची आकारणी करण्यात येणार आहे. मालकी हक्काचे व बांधकाम पूर्णत्वाचे कागदपत्राचे पूर्तता करण्यासाठी स्थापत्य कन्सल्टंट एजन्सीमार्फत नोटीस बजाविण्यात आल्या आहेत. त्या कागदपत्रांची पूर्तता करावी, असे आवाहन करसंकलन विभागाने केले आहे.

# खराब रस्त्यासाठी आता धरणार ठेकेदाराला जबाबदार

## दोष दायित्वाचा कालावधी निश्चित : नागरिकांकडून मागविले तक्रार अर्ज, जिल्हाभरात 92 रस्त्यांची कामे



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत विकसित केलेल्या रस्त्यांच्या कामांचा दर्जा उत्कृष्ट असावा, यावर भर देण्यात येत आहे. याबाबत कालावधी निश्चित केला असून, या दरम्यान रस्ता खराब झाल्यास तो संबंधित ठेकेदाराने दुरुस्त करून देण्याची जबाबदारी त्यांच्यावर असणार. रस्त्याच्या कामासंदर्भात संबंधित ठेकेदारांवर दोष दायित्वाचा कालावधी निश्चित केला असून, दोष आढळून आल्यास त्या संबंधित तातडीने दुरुस्ती संदर्भात मोठ्या प्रमाणात कार्यवाही करण्यात येणार आहे.

याबाबत पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी संबंधित निर्णयाची अंमलबजावणीचे सक्त निर्देश दिले आहे. दरम्यान, रस्त्या संदर्भात नागरिकांनी तक्रारी करण्याचे आवाहन केले आहे.

पीएमआरडीएचे कार्यक्षेत्र व्यापक असल्यामुळे सातत्याने विविध विकास कामे सुरू असतात. संबंधित कामे उत्कृष्ट आणि दर्जेदार व्हावी, या उद्देशाने महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी संबंधित विभागांना निर्देश दिले आहेत. यात प्राधिकरणाने विकसित केलेल्या रस्त्याच्या कामाबाबत निर्धारित कालावधीपर्यंत संबंधित ठेकेदारांवर दोष दायित्वाचा कालावधी निश्चित केलेला असतो. याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश जबाबदार यंत्रणेस दिले आहेत.

### ३ ते ५ वर्षांत काम करण्याची येते नामुष्की

दोष दायित्वाचा कालावधी रस्त्याच्या कामानुसार ३ ते ५ वर्षाचा आहे. या दरम्यान रस्ता खराब झाल्यास तो संबंधित ठेकेदाराने दुरुस्त करून देण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. यापूर्वी अनेक रस्त्यावरती पुन्हा पुन्हा काम करण्याची नामुष्की प्राधिकरणावरती येते. एकदा खर्च केल्यानंतर पुन्हा त्यावरती खर्च करण्यासाठी वेगळा निधी वापरण्यात येतो. मात्र आता इथून पुढे संबंधित ठेकेदाराला जबाबदारी करावी लागणार आहे.

दरम्यान, पीएमआरडीएच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने रस्त्यांची कामे करण्यात आलेली आहेत. यात रस्त्यांची सुधारणा, रुंदीकरण, काँक्रिटीकरणाचे समाविष्ट आहे. संबंधित कामे ठेकेदारांच्या माध्यमातून करण्यात आली असून त्यांच्यावर संबंधित कामानुसार दोष दायित्वाचा कालावधी साधारणतः ३ ते ५ वर्षाचा निश्चित केला आहे. या कालावधीत जर रस्ता खराब, नादुरुस्त झाला तर तो संबंधित ठेकेदाराने तातडीने दुरुस्त करून देणे बंधनकारक असणार आहे.

**तालुकानिहाय कामांची संख्या**

» नागरिकांना सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने जिल्हाभरात ९२ रस्त्यांची कामे करण्यात आली आहेत. यात सर्वाधिक कामे हवेली, पुरंदरसह शिरूर तालुक्यातील आहे. यासह मावळ, खेड आणि वेल्हे तालुक्यातील प्रत्येकी ६, मुळशी ९, भोर ८, हवेली २६, दौंड ५, पुरंदर व शिरूर प्रत्येकी १३ रस्त्यांची कामे करण्यात आली आहेत.

### दीडशे किलोमीटर रस्त्यांची कामे

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून सन २०१९-२० ते २०२३-२४ पर्यंत एकूण १४८ किलोमीटरपेक्षा अधिक रस्त्यांची कामे झाली आहेत. यात मावळ तालुक्यात १४.५३,खेड १५.२४,मुळशी १४, भोर ७.२५, वेल्हे ५.३५, हवेली २६.६, पुरंदर २२.१, दौंड ७.८५ आणि शिरूर तालुक्यात ३५.५ किलोमीटरची रस्त्यांची कामे विविध ठेकेदारांच्या माध्यमातून करण्यात आली. त्याचप्रमाणे येत्या चार महिन्यांमध्ये आणखीन काही रस्त्याची कामे होऊ शकतात.

> पीएमआरडीएच्या माध्यमातून रस्त्यांची कामे करण्यात आलेली आहेत. संबंधित रस्ते दर्जेदार व्हावेत, या उद्देशाने ठेकेदारांवर दोष दायित्वाचा कालावधी निश्चित केला आहे. या दरम्यान रस्ते खराब झाल्यास, संबंधित गाव, भागातील नागरिकांनी याबाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे अर्ज करावे. त्याबाबत निश्चित पुढील कार्यवाही करण्यात येईल.
>
> - डॉ. योगेश म्हसे, महानगर आयुक्त पीएमआरडीए.

# झेंडूच्या फुलांनी आणले शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी

## झेंडूच्या फुलांच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने झेंडू उत्पादक शेतकरी अडचणीत



**पुणे | प्रतिनिधी**

झेंडूच्या फुलांच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने झेंडू उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. झेंडू फूल पिकासाठी लाखो रुपयांचे भांडवल गुंतवून आता फुलांना कवडीमोल बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात झेंडू उत्पादक शेतकरी अधिक आहेत. यंदा गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा, दिवाळी या सणांमध्ये झेंडूच्या फुलांना चांगला बाजारभाव मिळाला. परंतु, दिवाळीनंतर आता झेंडूच्या फुलांच्या बाजारभावात प्रचंड घसरण झाली आहे. महिन्यापूर्वी झेंडूला किलोला 50 ते 60 रुपये बाजारभाव मिळत होता. आता त्यात घसरण होऊन कवडीमोल बाजारभाव मिळत आहे.

झेंडूच्या पिकासाठी शेतकऱ्यांनी लाखो रुपयांचे भांडवल गुंतविले आहे. अनेक शेतकऱ्यांनी मल्चिंग पेपर, ठिबक सिंचनाचा वापर करून झेंडूचे पीक घेतले आहे. रोपवाटिकांमधून महागडी रोपे, खते, औषधे, मजुरीसाठी मोठे भांडवल गुंतविले आहे. परंतु, आता बाजारभावात मोठी घसरण झाली आहे.

त्यामुळे झेंडूच्या पिकासाठी गुंतविलेले भांडवल देखील वसूल होत नाही. रांजणी गावातील फूल उत्पादक शेतकरी बाबासाहेब भोर यांनी झेंडूची लागवड केली. त्यासाठी त्यांनी मल्चिंग पेपरसह ठिबक सिंचनाचा वापर केला.

फुलांना सूर्यप्रकाश मिळावा, यासाठी त्यांनी विद्युत प्रकाशाची सोय केली. सध्या त्यांनी पिकवलेली झेंडूची फुले लक्ष वेधून घेत आहेत. मात्र, फुलांचे बाजारभाव घसरले आहेत. गुंतविलेले भांडवल वसूल होणार नसल्याचे शेतकरी भोर यांनी सांगितले.